Historicity Research Journal
ISSN : 2393-8900

Impact Factor : 0.4521 (UIF)
Volume - 2 | Issue - 11 | July - 2016

इंदापूर तालुक्यातील विटभट्टी कामगारांचा अर्थिक व सामाजिक अभ्यास

प्रा. भोर भिमाजी काशिबा
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे.

प्रस्तावना

विटभट्टी उद्योग, ग्रामोद्योग, कुटीरउद्योग आणि लघुउद्योग या दृष्टीने महत्वाचा आहे. विटभट्टी उद्योग अकुशल आणि बेकार घटकांना काम मिळवून देणारा महत्वाचा व्यवसाय आहे. अल्प भांडवलावर हा उद्योग सुरू करता येत असल्या कारणाने अनेक लोक हा व्यवसाय करू शकतात.

विटभट्टी उद्योगाच्या अभ्यासाचे महत्व :–

विटभट्टी उद्योग अनेक दृष्टीने महत्वाचा उद्योगधंदा आहे. ते पुढील प्रमाणे –

१. विटभट्टी उद्योग कुशल व अकुशल कामगारांना रोजगाराच्या संधी मिळवून देणारा आहे.

२. हा उद्योग बांधकामाच्या वाढीवर अवलंबून आहे. म्हणजेच बांधकाम उद्योगात रोजगाराला चालना मिळवून देणारा आहे.

३. विटभट्टी उद्योग खाणीतून कोळसा काढणे, माती गोळा करणे, वाहतूक करणे इत्यादी कामगारांना रोजगार मिळवून देणारा आहे.

४. विटांचे उत्पादनानंतर विटा ग्राहकांना पोहोच करण्याच्या कामगारांना रोजगार मिळतो.

५. प्रशिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा खर्च नाही, अनुभवाने हा उद्योग चालतो.

६. कमीत कमी धोक्यामध्ये व भांडवलामध्ये चांगले उत्पन्न मिळते.

इंदापूर तालुक्यातील विटभट्टी उद्योग :–

भारतात सध्या १ लाख ५० हजार पेक्षा जास्त विटभट्टया आहेत. भारताचा विट उत्पादनात जगात दुसरा क्रमांक आहे तर चिनचा प्रथम क्रमांक आहे. भारतात १ कोटी पेक्षा अधिक लोकांना रोजगाराच्या संधी या उद्योगाने निर्माण करून दिल्या आहेत. महाराष्ट्रात १५ हजार विटभट्टया आहेत, तर पुणे जिल्हयात १२५० विटभट्टया कार्यरत आहेत. इंदापूर तालुक्यात १५४ विटभट्टया विटांचे उत्पादन करत आहे. सन २०१२ चे आकडेवारी नुसार सरासरी ५ ते १० लाख उत्पादन प्रत्येक विटभट्टी मालक करत आहेत. म्हणजेच १० कोटी विटांचे उत्पादन दरवर्षी इंदापूर तालुक्यात होते. विटभट्टी व्यवसायासाठी फारशा तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता नाही. हा उद्योग वर्षभरात ६ ते ८ महिने चालतो. विटभट्टी मालकांच्याही संघटना नाहीत. तसेच कामगारांच्या ही संघटना नाहीत. विटभट्टयांना मा. तालुका तहसिलदारांकडून परवाना घ्यावा लागतो. परंतु अनेक विटभट्टी मालक तहसिलदारा कडून परवाना घेत नाहीत. काही थोडया विटभट्टयांची लघुउद्योग म्हणून नोंद झालेली आहे.

इंदापूर तालुक्यातील विटभट्टयांनी तालुक्यात ३००० पेक्षा जास्त कामगारांना रोजगार मिळवून दिला आहे. याचा अर्थ रोजगाराच्या दृष्टीने विटभट्टी उद्योग महत्वाचा उद्योग आहे.

विट उत्पादनाची प्रक्रिया :–

विट उत्पादन हे अकुशल श्रमीकांचे काम असले तरी विट उत्पादनाची एक प्रक्रिया असते. तसेच कमीत कमी खर्चात विटांचे उत्पादन होण्यासाठी विटभट्टी मालकांना सतत सक्रिय रहावे लागते. विट उत्पादनाची आदर्श पध्दत उत्पादकांनी पुढील प्रकारे सांगितली आहे. विटभट्टी कामगारांना विविध कष्टाची कामे करावी लागतात. त्यादृष्टीने विट उत्पादनाची प्रक्रिया अभ्यासणे आवश्यक ठरते.

धस लावणे :–

विटभट्टी मालकांना भट्टीसाठी चांगल्या दर्जाची मृदा आणावी लागते. कमीत कमी खर्चात मृदा कशी मिळेल यासाठी विटभट्टी मालक सतर्क असतात. वर्षभरातील १० महिने मृदा आणण्याचे काम चालते. पाऊस जास्त असेल तेंव्हा मृदा आणण्याचे काम बंद असते. आणलेली मृदा व्यवसायाच्या ठिकाणी एका बाजूस एकावर एक मातीची खेप टाकली जाते, त्यास धस लावणे असे म्हणतात. धशी खाली १ फूट उंच दगड–खंगर विटांचे अस्तर लावावे लागते. धशीची रूंदी ४० फूट व उंची १५ ते २० फुटांपर्यंत असते. चिकट व भरसट मृदेचे एकावर एक थर टाकावे लागतात. धशीसाठी माळ माती किंवा गाळमाती आणली जाते. धशीतील माती चांगली रापून दिल्यानंतर चांगल्या दर्जाची विट तयार होते. अशा प्रकारे माती ट्रॅक्टर मध्ये भरणे व उतरविणे या प्रकारची कामे विटभट्टी कामगारच मोठया प्रमाणात करतात.

गारा करणे :–

धशीतील मृदा ओढताना तिच्यातील प्रत्येक थर गा–यात येईल याची काळजी घ्यावी लागते. मातीचा गारा करणा–या मजुरास गारेकरी म्हणतात. गारा करताना ढेकळे फोडणे आवश्यक आहे. गा–यातील गवत, पाला, दगड–गोटे वेचून दूर करावेत. गारा करताना गारेकरी मृदेचे मोजमाप करत नाहीत. अंदाजाने प्रमाण निश्चित केले जाते. कोरडी मृदा ओढून तिचे आळे तयार केले जाते. आळयाच्या कडेच्या भागावर ४ घमेली खर (कोळशाची चुरी – राख) टाकली जाते. आळयात एकूण ४० ते ५० डबे (१ डबा – १५ लिटर) पाणी टाकले जाते. सुरूवातीस ७५ टक्केच पाणी टाकले जाते व नंतर गरजेनुसार पाण्याचे प्रमाण वाढविले जाते.

सध्याचे काळात डब्याऐवजी पाईपाने पाणी सोडतात. सुरूवातीचे पाणी आळयाच्या कडा ओल्या झाल्या की पाणी बंद करतात. पाणी सोडल्यानंतर ३ ते ५ हारे बगॅस (चिपाडाचा भूसा) किंवा ८ घमेली लाल राख आळयाच्या कडेच्या भागावर टाकली जाते आणि पहिली पावली दिली जाते. (गारा पायाने चक्राकार तुडविली जातो) असे करताना पायाला लागलेले दगड–खडे बाहेर काढून टाकले जातात. गा–याच्या पुढील बाजूस राखेच्या पाण्याचा सडा मारला जातो. त्यानंतर हवा तेवढा गारा फावडयाने तोडून घेऊन सडा मारलेल्या जागेत तो घेतला जातो. नवीन जागी गा–याला दुसरी पावली दिली जाते. नंतर विट थपाई सुरू होते. गारा घट्ट झाल्यास कमीत कमी पाणी टाकून थपाईसाठी घेतला जातो. गारा ढिला झाल्यास त्यात २०–२५ भाजलेल्या विटा टाकून अतिरिक्त पाणी शोषून घेतले जाते.

थपाई व वाळवणी :–

गरेकरी कुटुंबात २ (नवरा व बायको) किंवा ४ (२स्त्रीया व २ पुरूष) माणसे असतात. ४ माणसांचे गारे, २ माणसांच्या गा–यापेक्षा अधिक दर्जेदार उत्पादन देतात. कारण ४ माणसांच्या गा–यात १ स्त्री छाननी (गा–यातून दगड–गोटे, गाठी, गवत इ. काढून विटाळयाच्या आकारापेक्षा थोडा मोठा गोळा चोळणी करून घेऊन समोरील गोणपटावर टाकणे), १ स्त्री थपाई व २ पुरूष झेलण्याचे (म्हणजेच भरलेली सिंगल/डबल वीटाळी फडापर्यंत वाहून नेऊन ती जमीनीवर उलटवून विटा पाडण्याचे) काम करतात. एक गारेकरी कुटुंब एका सिझनला सरासरी १ लाख विटा बनविते. सिझनच्या आधी त्यांना १५ ते २० हजार रूपये ॲडव्हान्स दिला जातो. साचा भरल्यानंतर त्याच्या तोंडावर लागडी पट्टी फिरवून जादा चिखल काढून टाकला जातो. कच्च्या विटा साच्यातून उलटवून टाकण्याआधी पाणी व राख मारून फड शांत करतात. जेणेकरून थापलेल्या विटांना चिरा पडणार नाहीत. वापरलेल्या विटाळयात पाणी टाकून हात फिरवून त्याची काळजीपूर्वक सफाई केल्यास पुढच्या विटांना चांगली धारकोर येते.

सुकलेला विटांचे पंजे करावे लागतात. म्हणजेच सपाट विट त्याच ठिकाणी कोडी केली जाते. उन्हाळयात दुस–या दिवशी तर हिवाळयात तिस–या चौथ्या दिवशी थापलेल्या विटांचे पंजे केले जातात. पंजे केलेल्या विटा खडखडीत वाळण्यासाठी विशिष्ट पध्दतीने एकावर एक १० थरात रचल्या जातात. त्याला खडके मारणे असे म्हणतात. खडक्यामध्ये विटा खडखडीत वाळण्यासाठी उन्हाळयात २ ते ३ दिवस तर हिवाळयात ५ ते ६ दिवस लागातात म्हणजेच थपाई केलयानंतर विटा पूर्णपणे वाळायला उन्हाळयात ५ दिवस तर हिवाळयात ८ ते १२ दिवस लागतात.

विट भट्टीत भाजणे :–

विटा वाळल्यानंतर त्या भट्टीत भाजाव्या लागतात. भट्टी रचणा–या मजुरास भटकर म्हणतात. भट्टी रचण्याआधी विशिष्ट प्रकारच्या कोळशाची व लाकडांची मांडणी करावी लागते. त्यावर वाळलेल्या विटा रचल्या जातात. विटा रचने हे कुशल मजुराचे काम असते. भटकर भट्टीत विटा रचण्याचे काम करतात. इतर स्त्री–पुरूष विटा वाहून आण्ण्याचे काम करतात. फड व भट्टीतील अंतर २० फुटांपासून २०० फुटांपर्यंत असते. भट्टी रचण्याची जागा फडापेक्षा एक ते दिड फुट उंच असते. भट्टीच्या दोन्ही तोंडा कडून मध्यापर्यंत उतार ठेवतात, जेणेकरून भट्टी ढासळयाची शक्यता कमी असते. भट्टीच्या सर्व बाजूंनी ३ ते ४ इंच जागा सोडून भिंती बांधतात व या फटीत कणी (चुरा) भरतात. कणीमध्ये भट्टीच्या पृष्ठभागाजवळील विटांची भाजणीही उत्तम होते. सर्वात खालच्या इंधनाच्या थरात कोळशी (कोल ॲश) वापरल्यास भट्टी खचत नाही. इंधनाच्या सर्वथरांवर खडेमीठ पसरून टाकतात. १० हजार विटा भाजण्यासाठी १ टन कोळसा लागतो. तर १ लाख विटांची भट्टी पेटविण्यासाठी सुरूवातीस चार मण लाकुड लागते. भट्टी पेटविल्यापासून विटा भाजून भट्टी थंड होण्यासाठी १५ ते २० दिवस लागतात. भट्टीत जळणालगतच्या थरात खंगर विटा आणि बाहेरच्या थरात भाजलेल्या विटा निघतात.

अशाप्रकारे विटभट्टी उद्योगात विटा तयार केल्या जातात. तयार विटा ग्राहकांना मागणीनुसार पुरवठा केल्या जातात. विटांचा पुरवठा शिल्लक असे पर्यंत विटा पोहोच केल्या जातात.

विट उत्पादनाचा खर्च :–

विटभट्टी उद्योग एक पारंपारिक आणि मूलभूत उद्योग आहे. विविध विटभट्टी उद्योजकाच्या मुलाखती घेतल्या असता तसेच विटभट्टी अभ्यास तज्ञांच्या माहिती नुसार २०१२–१३ च्या किंमती नुसार प्रत्येक विटेचा सरासरी उत्पादन खर्च रू २.३५ येतो. विटेची लांबी ९ इंच बाय रूंदी ४ इंच बाय जाडी २.५ इंच गृहीत धरून विटांचा खर्च दर्शविण्यात आली आहे.

प्रति विट उत्पादन खर्च (वर्ष 2012–13)

अ.क्र.	खर्चाचा तपशिल	खर्चाचे प्रमाण (शेकडा)
१	इंधन	४५
२	मजूरी	२८
३	कच्चा माल	१५
४	व्यवस्थापन व कायदेशीर बाबी	०६
५	इतर खर्च (नुकसान)	०६
	एकूण	१००

वरील प्रकारे विट उत्पादनाचा खर्च विभाजीत करण्यात आला आहे. इंधनावर सर्वाधिक ४५ टक्के खर्च उत्पादकांना करावा लागत आहे. मजूरीचा खर्च उत्पादन खर्चाच्या २८ टक्के आहे. विटभट्टी उद्योगाला लागणा–या कच्च्या मालावरील खर्च १५ टक्के येतो. व्यवस्थापन व कायदेशीर बाबींसाठी ६ टकके खर्च येतो इतर खर्चाचे प्रमाण ६ टक्के आहे. अशा प्रकारे २ रू ३५ पैशाच्या खर्चाची विभागणी होते.

विटभट्टी कामगारांना मिळणारे उत्पन्न :–

विटभट्टी कामगारांना विटा बनविण्याची मजूरी दर हजार विटा मागे रू ४०० पर्यंत मिळते. तसेच विटभट्टी पर्यंत वाहून नेणे याची मजूरी रू २५० मिळते. तर भट्टीत विट रचने, भाजणे या प्रकारचे काम भटकर करतात. त्यांना दर हजारी रू ५० मिळतात. अशा प्रकारे विटभट्टी कामगारांना विटा तयार करण्यापासून भट्टीत भाजण्यापर्यंतची मजूरी रू ७०० पर्यंत मिळते.

२०१२–१३ चे किंमतीनुसार दर हजार विटांची किंमत ग्राहकास रू ४०००/– होती. पैकी ७०० रू चे उत्पन्न मजूरीपोटी कामगारांना मिळत होते. यावरून एकूण उत्पादन खर्च काढता येईल.

समजा २८ टक्के खर्च मजुरीवर होतो. एक हजार विटांसाठी मजूरी पोटी कामगारांना ७००रू मिळत असतील. तर एक हजार विटांच्या १०० टक्के खर्च म्हणजे रू २५०० येतो.

याचा अर्थ १००० विटा बनविण्याचा खर्च २५०० रू येतो तर विटभट्टी मालकास रू ४००० रू वजा २५०० = १५०० रू दर हजार विटांमागे मिळतात. विटभट्टी मालकास धोका व अनिश्चितता पत्काण्याचा मोबदला रू १५००/– मिळतो.

विटभट्टी कामगारांस वर्षातून ६ ते ८ महिने काम मिळते. या काळात एक कुटुंबाने १ लाख विटा बनविल्यास त्यांना रू ७००००/– मजूरी मिळते.

विटभट्टी कामगारांच्या खर्चाचे विवरण :–

प्रत्येक विटभट्टी कामगाराचे आचार–विचार भिन्न असतात. त्यामुळे खर्चाची दिशा सुध्दा वेगवेगळी असते. विटभट्टी व्यवसायातील बहुसंख्य कामगारांच्या अभ्यासातून त्यांच्या सर्वसाधारण खर्चाचे विवरण पुढील प्रमाणे मांडता येईल.

अ.क्र.	तपशिल	शेकडा प्रमाण
१	<u>उपभोग्य खर्च</u>	
	१)जीवनावश्यक वस्तू (अन्नधान्य, कपडे इ.)	२०
	२)चैनीच्या वस्तू (मोटार सायकल, मोबाईल, टी.व्ही, डिश इ.)	२०
	३)सामाजिक उपक्रम/प्रवास खर्च	१०
	४)व्यसनावरील खर्च	१०
	५)कर्ज व व्याज परतफेड	२०
	६)इतर खर्च (आजारपण इ.)	०५
२	<u>उत्पादक खर्च</u>	
	१)घर बांधणी, दुरूस्ती, प्लॉट खरेदी, शेती, मशागत इ.)	१० टक्के
	२)पूरक व्यवसाय	०५ टक्के
	एकूण	१०० टक्के

वरील प्रकारे विटभट्टी कामगारांना सर्व मार्गापासून मिळणा-या उत्पादनाचा अभ्यास केल्या उपभोगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ८५ टक्के खर्च केला जातो. तर १५ टक्के खर्च उत्पादक कार्यासाठी होतो.

उपभोग्य खर्चात देखील जीवनावश्यक वस्तूंवरील खर्चाचे प्रमाण फक्त २० टक्के आहे. तर चैनीच्या वस्तूंवरील खर्चाचे प्रमाण देखील २० टक्के आहे. याचा अर्थ विटभट्टी कामगार जीवनावश्यक वस्तूंपेक्षा चैनीच्या वस्तूंना तुलनात्मक जास्त महत्व देत आहेत. बहुसंख्य विटभट्टी कामगार कोठूनतरी कर्ज काढतात. अशा कर्जावरील व्याज आणि मुद्दलाच्या परतफेडीसाठी २० टक्के खर्च होतो. याशिवाय व्यवसानावरील खर्च १० टक्के आहे. सामाजिक उपक्रम/प्रवास इत्यादी खर्च १० टक्के आहे. तर इतर खर्च (आजारपण, शाळेत जाणारी मुले इ.) ०५ टक्के होतो.

उत्पादक कार्यात गुंतवणूक करणा-या खर्चाचे प्रमाण फक्त १५ टक्के आहे. घर बांधणी, दुरूस्ती, प्लॅट व शेती खरेदी इत्यादी मध्ये १० टक्के खर्च तर पुरक व्यवसायासाठी ५ टक्के खर्च होतो. त्यामुळे विटभट्टी कामगारांना काहीना काही उत्पन्न वर्षभर मिळत रहाते.

विटभट्टी कामागारांची सामाजिक स्थिती :–

विटभट्टी कामगारांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास केला असता पुढील संवर्गातील लोक विटभट्टी व्यवसायात गुंतलेले दिसून येतात.

संवर्गनिहाय वर्गवारी

अ.क्र.	तपशिल	शेकडा प्रमाण
१	अनुसूचित जाती	५८.३३
२	अनुसूचित जमाती	१३.३३
३	भटके विमुक्त (भिल्ल)	७.५०
४	इतर मागासवर्गीय	१२.५०
५	कुंभार	४.१७
६	खुले	४.१७
	एकूण	१००

वरील कोष्टकावरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक ५८.३३ टक्के कामगार अनुसूचित जाती मधील या व्यवसायात आहेत. अनुसूचित जमातीतील १३.३३ टक्के कामगार आहेत. तर इतरमागास वर्गीयांचे प्रमाण १२.५० टक्के आहे. विटभट्टी व्यवसाय तसा पूर्वापार कुंभार समाजाचा आहे. परंतु या व्यवसायात फक्त ४.१७ टक्के कामगार कुंभार समाजाचे आहेत. तसेच खुल्या वर्गातील प्रमाण देखील अत्यल्प म्हणजे ४.१७ टक्के आहे. थोडक्यात मागासलेला अशिक्षित समाज विटभट्टी व्यवसायात गुंतलेला आहे.

तालुक्यातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्या :–

विटभट्टी व्यवसायचे वरील प्रकारे विवेचन केले आहे. त्यावरून असे दिसते की, विटभट्टी कामगारांच्या अनेक आर्थिक व सामाजिक समस्या आहेत. ते पुढील प्रमाणे –

१) विटभट्टी व्यवसायत अकुशल कामगार वर्ग आहे. ते पारंपारिक पध्दतीने उत्पादन करतात. त्यामुळे उत्पादकता कमी आहे.

२) पर्यावरण तज्ञांचा विरोध – विटभट्टी व्यवसाय प्रदुषण निर्माण करणारा आहे. त्यामुळे गावापासून दूर हा व्यवसाय सुरू करावा लागतो. त्यामुळे अनेक विटभट्टया बंद पडून कामगारांची बेकारी निर्माण होत आहे.

३) विटभट्टी कामगारांना अल्प उत्पन्न – विटभट्टी कामगार ६ ते ८ महिने काम करून त्यांचा हाती फारच थोडे उत्पन्न पडते. तेवढया उत्पन्नात कामगारांच्या वर्षभराच्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत.

४) अवकाळी पाऊसाचे संकट – विटभट्टी व्यवसायात आलीकडे अवकाळी पाऊसाचे संकट मोठया प्रमाणात येऊ लागले आहे. त्यामुळे विटभट्टी मालकांचे खूप मोठे नुकसान होते. त्यामुळ मालकवर्गाचा तोटा वाढतो.

५) शिक्षणाचे अल्प प्रमाण – विटभट्टी व्यवसायातील कामगारांच्या शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे कामगारांच्या रहाणीमानाचा दर्जा अतिशय निकृष्ठ प्रतिचा आहे.

६) व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त – जवळ जवळ सर्वच विटभट्टी कामगार व्यसने करतात. स्त्री आणि पुरूष दोघेही व्यसने करतात. व्यसनाधिनता ही कामगारांची मोठी समस्या आहे.

७) शिक्षण, आरोग्याकडे दूर्लक्ष – विटभट्टी कामगारात निरक्षरता आणि अल्पशिक्षितपणा असे दोष दिसून येतात. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे ते लक्ष देत नाहीत. तसेच या कामगारात आरोग्याचे प्रश्न मोठे गंभीर आहेत.

थोडक्यात विटभट्टी व्यवसायास आजच्या जागतिकी करणाच्या काळात विशेष महत्वाचे स्थान आहे. परंतू आजही परंपरागत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हा उद्योग चालला आहे. असंख्य समस्या या उद्योग व्यवसायाच्या आहेत.